# ९ .पर्यटन, वाहतूक व संदेशवहन

ब्राझील- पांढऱ्या वाळूच्या पुळणी, आकर्षक आणि स्वच्छ सागरी किनारे, सुंदर बेटे, ॲमेझॉन खोऱ्यातील अरण्ये,प्राणी,पक्षी,उद्याने. ब्राझीलिया हे राजधानीचे शहर पाहण्यासाठी पर्यटक येतात. सावो पावलो, रिओ दी जेनेरिओ ही शहरे पर्यटकांना आकर्षित करतात.

* भारताला ब्राझील पेक्षा जास्त पर्यटक भेटी देतात. पण पर्यटन क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नाचा वाटा ब्राझील पेक्षा कमी आहे. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न व लोकसंख्या ब्राझीलच्या तुलनेत खूपच जास्त आहे. त्यामुळे भारताचा राष्ट्रीय उत्पन्नाचा वाटा कमी दिसतो व या क्षेत्रातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त दिसते.

*भारत:- २०१० पासून भारतातील आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्या वाढताना दिसते. परदेशी पर्यटक ऐतिहासिक, सांस्कृतिक, वैद्यकीय व्यवसाय इत्यादींसाठी येतात. भारतातही पर्यावरणपूरक पर्यटनाला महत्त्व दिले जात आहे.

* ब्राझील वाहतूक:- ब्राझीलमध्ये रस्ते वाहतूक आढळते. ब्राझीलच्या पूर्व भागात रस्ते मार्गांचा विकास झालेला आहे पण पश्चिम भागात मात्र ॲमेझॉन नदीचे खोरे , वनाच्छादित प्रदेश, दलदल असल्याने रस्ते मार्गाचा विकास मर्यादित झाला आहे. ॲमेझॉन नदीतून पेरू देशातील एक इक्वीटॉस ठिकाणापर्यंत जलवाहतूक होते. पराना ही दक्षिण वाहिनी नदी व ब्राझील या किनारी भागात जलवाहतूक होते. ब्राझील मध्ये लोहमार्गाचा व हवाइमार्गाचा जास्त विकास झालेला नाही .

*भारत वाहतूक:- भारतात ब्राझीलच्या तुलनेत लोहमार्ग व रस्ते वाहतुकीचे जाळे दाट आहे. लोहमार्गाच्या विकासामुळे प्रवासी वाहतूक व मालवाहतूक सुलभ झाली आहे. जलवाहतूक हे वाहतुकीचे स्वस्त साधन आहे.

नदया, कालवे, खाड्या, जलसाठे यातून अंतर्गत जलवाहतूक होते. ९५% आंतरराष्ट्रीय व्यापार हा सागरी मार्गाने होतो.

भारतातील आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक जास्त विकसित झाली आहे.

**ब्राझीलमधील संदेशवहन :**

ब्राझील मधील दूरसंचार सेवा म्हणजे दूरध्वनी, भ्रमणध्वनी, दूरदर्शन, आकाशवाणी, संगणक, इंटरनेट अतिशय कार्यक्षम विकसित आहे.

**भारतातील संदेशवहन :**

भारतीय प्रमाणवेळ ही ग्रीनिच वेळेच्या ५ तास ३० मिनीटे पुढे आहे. भारतातील इलेक्ट्रॉनिक्स वस्तूच्या प्रगतीमुळे दूरसंचार उद्‌योग अतिवेगाने वाढत आहे. संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट अशा डिजिटल साधनांच्या वाढत्या प्रभावामुळे हे क्षेत्र विस्तारत आहे. स्वदेशी तंत्रज्ञानाच्या आधारे तयार केलेले उपगृह व प्रक्षेपण तंत्र यांच्या वापरामुळे भारताचा या क्षेत्रात खूप विकास होत आहे.